Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

# प्राथमिक स्तरातील विद्यार्थ्यांना माहिती संप्रेषण तंत्रज्ञान उपक्रमांच्या अंमलबजावणीच्या परिणामकारकतेचा अभ्यास

संशोधकाचे नाव
श्रीम. प्रज्ञा अंकुश राळेभात
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

मार्गदर्शकाचे नाव
डॉ. रश्मी जोशी
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

***१. सारांश -***

***आजचे युग हे माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचे युग आहे. या युगामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये आयसीटी चा वापर मोठ्या प्रमाणात वाढलेला आपल्याला दिसून येतो अगदी सकाळच्या अलार्म पासून ते रात्रीच्या मोबाईलच्या वापरापर्यंत अशाप्रकारे आपण या तंत्रज्ञानाचा वापर आपल्या आयुष्यामध्ये करत असतो. शिक्षण, आरोग्य, शाळा, कला, क्रीडा, साहित्य या सगळ्यांमध्ये आयसीटीचा वापर मोठ्या प्रमाणात होताना दिसून येतो. मग आपले विदयार्थी आणि शिक्षण क्षेत्र त्यापासून दूर राहणेशक्यच नाही. उच्च शिक्षण स्तरावर तर आय. सी. टी चा वापर हा मोठ्या प्रमाणावर होत आहे. संशोधनामध्ये देखील आयसीटी चा वापर हा मोठ्या प्रमाणात होताना दिसून येतो. परंतु अलीकडील काळामध्ये प्राथमिक स्तरावर देखील मोठ्या प्रमाणावर माहिती माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर वाढलेला दिसून येतो याचे कारण मुख्य करून विद्यार्थ्यांना सहजपणे उपलब्ध होणारी माहिती आणि ती माहिती वैविध्य स्वरुपाची असल्यामुळे याचा वापर हा जास्तीत जास्त प्रमाणात होताना दिसून येतो. अर्थातच या माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचे फायदे जर आपण, लक्षात घेतले तर प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना याच तत्रज्ञानाचा वापर करून त्यांचे गुणवत्ता शैक्षणिक संपादन उंचवता येईल.***

cc BY *Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's* licensed Based on a work at *http://www.goeiirj.com*

**महत्त्वाचे शब्द -**

१) प्राथमिक स्तर
2) माहिती संप्रेषण तंत्रज्ञान (आय. सी. टी )

१. प्राथमिक स्तर - इ.१ ली ते ते ७वी पर्यंत शिक्षणाचा जो काही स्तर आहे, त्याला प्राथमिक स्तर असे म्हणतात.

२. माहिती संप्रेषण तंत्रज्ञान- माहितीचे आदान प्रदान करण्यासाठी फॅक्स, मोबाईल, लॅपटॉप एलसीडी, प्रोजेक्टर या ज्या साधनांचा वापर केला जातो, त्यांना माहिती संप्रेषण तंत्रज्ञान असे म्हणतात.

**प्राथमिक स्तरातील विदयार्थ्यांना माहिती संप्रेषण तंत्रज्ञान उपक्रमांच्या अंमलबजावणीच्या परिणामकारकतेचा अभ्यास या विषयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

संशोधक शिक्षक म्हणून अध्यापन करत असताना त्याला प्रत्यक्ष अध्यापनाच्या वेळी अनेक त्रुटी जाणवल्या यामध्ये विद्यार्थी अलीकडील काळात मोठ्या प्रमाणामध्ये आयसीटीच्या तंत्राशी माहिती संप्रेषण तंत्रज्ञान शी मोठ्या प्रमाणात जोडले गेलेले आहेत आणि याचा वापर केल्यास विद्यार्थ्यांना अध्ययन आणि अध्यापन करणे दोन्हीही चांगल्या पद्धतीने होऊ शकते ही जाणीव संशोधकाला झाली. कोरोनाच्या पार्श्वभूमीनंतर माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढलेला दिसून येतो. मोबाईलद्वारे अध्ययन करण्याची सवय खूप जणांना लागलेली आहे त्याचे काही दुष्परिणाम वगळता ॲसिटिसा जर आपण योग्य प्रमाणात योग्य त्या पद्धतीने वापर केला तर निश्चितच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनामध्ये वाढ होऊ शकते हे संशोधकाला जाणवले आणि म्हणूनच प्रस्तुत संशोधन कार्य संशोधकाने हाती घेतलेले आहे.

**संशोधन समस्येची सदयस्थिती –**

प्राथमिक स्तरातील विदयार्थ्यांना माहिती संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) उपक्रमांच्या अंमलबजावणीच्या परिणामकारकतेचा अभ्यास सध्या अनेक ठिकाणी सुरु आहे. या अभ्यासाचे मुख्य उदिष्ट्य आहे की - ICT उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर काय परिणाम होतो, शिक्षकांना ICT चा वापर कसा करता येतो आणि या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या पद्धतीमध्ये काय बदल होतात, तसेच विदयार्थ्यांना ICT चा वापर करण्यासाठी तयार करणे.

**अभ्यासाची सदयस्थिती-**

1) ICT चा वापर आणि परिणाम –

अनेक अभ्यास दर्शवतात की ICT चा वापर विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेते सकारात्मक बदल घडवू शकतो. मुलांमध्ये ICT चा वापर वाढल्यास त्यांची शिकण्याची क्षमता वाढते, त्यांना नवीन गोष्टी शिकण्यास मदत होते आणि ते अधिक सक्रियपणे शिकतात.

2) शिक्षण पद्धतीत बदल –

ICT च्या मदतीने शिक्षकांनी विदयार्थ्यांना शिकवण्यासाठी विविध साधनांचा वापर करायला हवा हे अधिक आकर्षक आणि प्रभावी बनवते.

3) शिक्षकांची तयारी -

ICT उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शिक्षक यांना ICT चा वापर करण्यासाठी योग्य प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

4) डिजिटल साक्षरता -

ICT च्या माध्यमातून डिजिटल साक्षरता -साक्षरता प्राप्त होते, ज्यामुळे, ते भविष्यात तंत्रज्ञा नाचा योग्य वापर करू शकतात.

5) पालकांची भूमिका-

पालकांनीही विदयार्थ्यांना ICT चा योग्य वापर करण्यासाठी प्रोत्साहन दयावे ICT चा वापर करून

विदयार्थी आणि पालक यांच्यामध्ये संवाद साधता येतो, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला मदत होते.

6) शिक्षणाचे स्वरूप

ICT च्या मदतीने शिक्षण अधिक वैयक्तिक आणि आकर्षक बनवता येते विदयार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार आणि गरजेनुसार शिकायला मदत होते.

**निष्कर्ष -**

१ प्राथमिक स्तरातील विदयार्थ्यांना माहिती संप्रेषण तंत्रज्ञान तंत्रज्ञान (ICT) उपक्रमांच्या अंमलबजावणीच्या परिणामकारकतेचा अभ्यास एक महत्त्वाचा विषय आहे.

२ या अभ्यासातून ICT चा वापर विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी किती उपयुक्त आहे, हे स्पष्ट होते.

३ तसेच शिक्षकांनी आणि पालकांनी विदयार्थ्यांना ICT चा योग्य वापर करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

**समारोप**

प्रस्तुत शोधनिबंधात संशोधन विषय समस्येची पार्श्वभूमी, ऐतिहासिक आढावा सद्यस्थिती याबाबत माहिती विवेचन करण्यात आले आहे.

**संदर्भसूची -**

1. बापट भा. गो. (1975) शैक्षणिक संशोधन, पुणेः नूतन प्रकाशन
2. भिंताडे वि. रा. (1994) शैक्षणिक संशोधन पद्धत पुणे: नूतन प्रकाशन
3. गूगल
4. मुळे रा. श. आणि उमाठे, वि. तू. (1977) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपुर: महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.